तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी चिखली यांचे कार्यालय, चिखली
जिल्हा बुलडाणा
ईमेलआयडी-tahsildarchikhli@gmail.com

क्रमांक/कावि/त.आस्था/335/2023 दिनांक- 25/09/2023

## जाहीरनामा

**विषय :-** चिखली तालुक्यातील कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचा आदेश क्रमांक/कावि/त.आ/कक्ष-5/230/23 दिनांक 15/09/2023

******

उपरोक्त संदर्भीय आदेशाच्या अनुषंगाने सर्व संबंधीत उमेदवारांना याव्दारे सुचित करण्यात येते की, चिखली तालुक्याअंतर्गत खालील साजाच्या नावासमोर प्रवर्गानुसार दर्शविल्याप्रमाणे कोतवालपदासाठी अर्ज मार्गविण्यात येत आहेत. खालील साजामध्ये त्यांचे नावासमोरील रकान्यात दर्शविल्याप्रमाणे गावांचा समावेश आहे. त्याकरीता खालील पात्रतेच्या उमेदवारांनी दिनांक 25/09/2023 ते 06/10/2023 या कालावधीत (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय, चिखली जि.बुलढाणा येथे अर्ज मुदतीच्या आत व्यक्तीशः सादर करावा. विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अर्जासोबत खुल्या प्रवर्गाच्या जागासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास परिक्षा शुल्क रु.500/- **(अक्षरी रुपये पाचशे फक्त)** व आरक्षित जागे करीता अर्ज करणाऱ्या उमेदवारास परिक्षा शुल्क रु.250/- **(अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त)** रोख स्वरुपात तहसिल कार्यालय, चिखली जि. बुलढाणा येथे जमा करुन पावती अर्जासोबत जोडावी. (अर्ज अपात्र झाल्यास किंवा उमेदवाराची निवड न झाल्यास कोणत्याही उमेदवारास भरणा केलेले परिक्षा शुल्क परत केल्या जाणार नाही.)

**-: कोतवाल संवर्गातील रिक्त पदाच्या साजांची नांवे, समाविष्ट गावे व आरक्षण :-**

| अ.क्र. | तलाठी साजाचे नांव | साजातील समाविष्ट गावे | आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | चिखली भाग-2 | चिखली, वळती, पळसखेड जयंती | इतर मागास प्रवर्ग (महिला) |
| 2 | शेलूद | शेलूद, दिवठाणा, सोमठाणा | सर्वसाधारण (महिला) |
| 3 | धोत्रा भणगोजी भाग-1 | धोत्रा भणगोजी, उत्रादा, दहिगांव | सर्वसाधारण |
| 4 | एकलारा | एकलारा, जांभरुण | विमुक्त जाती (अ) |
| 5 | नायगांव बु. | नायगांव बु., नायगांव खुर्द, सावंगी गवळी, डोंगरगांव. | अनुसूचित जाती |
| 6 | अंत्रीखेडकर | अंत्रीखेडकर, अमडापूर बु. | अनुसूचित जाती |
| 7 | मेरा बु.भाग-2 | मेरा बु., गुंजाळा, मनुबाई | भटक्या जमाती (ड) |

| अ.क्र. | तलाठी साजाचे नांव | साजातील समाविष्ट गावे | आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 8 | अंचरवाडी भाग-1 | अंचरवाडी, वसंत नगर, मिसाळवाडी | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (EWS) |
| 9 | अंचरवाडी भाग-2 | अंचरवाडी | इतर मागास प्रवर्ग |
| 10 | चांधई | चांधई, भोकर, पांघुळवाडी | अनुसूचित जमाती |
| 11 | माळशेंबा | माळशेंबा, साकेगांव, बोराळा | अनुसूचित जाती (महिला) |

## कोतवाल पदाकरीता उमेदवार खालील अर्हता पात्र असावा

1) उमेदवार शारिरिकदृष्टया सुदृढ असावा
2) दिनांक 25/09/2023 रोजी वय 18 वर्षांपेक्षा कमी व 40 वर्षांपेक्षा जास्त नसावे
3) अर्जदार संबंधीत तलाठी साजा अंतर्गत असणाऱ्या गावाचा रहिवासी असावा
4) अर्जदार किमान 4 था वर्ग उत्तीर्ण असावा
5) मागास प्रवर्गातील उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र, नॉनक्रिमीलेअर वरील अर्हता दिनांकापूर्वीचे जोडणे आवश्यक राहील.

## अर्ज करण्याची पध्दत

1) अर्ज हा विहित नमुन्यात असावा
2) विहित नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय, चिखली जि.बुलढाणा येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहतील
3) विहित नमून्यातील अर्जाकरीता अर्ज शुल्क रुपये 20/- रोख स्वरुपात भरावे लागेल
4) अर्ज सादर करतांना अर्जास रुपये 10/- कोर्ट स्टॅम्प चिटकवणे बंधनकारक राहील
5) आरक्षीत पदाकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने संबंधीत जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडावी तसेच उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (31 मार्च 2024 पर्यंत वैध असलेले) मागासवर्गीय उमेदवारास अर्जा सोबत जोडणे बंधनकारक राहील. (अनुसुचीत जाती व अनुसूचित जमाती उमेदवार वगळून)
6) उमेदवाराने पूर्ण भरलेला अर्ज शैक्षणिक पात्रता/ जातीचे प्रमाणपत्र इत्यादी विहित नमुन्यात भरुन तहसिलदार तथा सदस्य सचिव, तालुका निवड समिती, तहसिल कार्यालय, चिखली जि. बुलढाणा येथे दिनांक 25/09/2023 ते 06/10/2023 दरम्यान सायंकाळी 6.15 वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावा. विहित वेळेनंतर व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा अर्ज स्विकारला जाणार नाही. कोणीही पोस्टामार्फत किंवा कुरिअर मार्फत अर्ज पाठवू नये. पाठविल्यास सदर **अर्जाचा** विचार केला जाणार नाही व कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
7) सर्व पात्र उमेदवारांना त्यांचे प्रवेशपत्र हे दिनांक 12/10/2023 ते 17/10/2023 पर्यंत संबंधित साजाचे तलाठी मार्फत वितरीत करण्यांत येतील. प्रवेशपत्र वरील नमूद तारखेस प्राप्त न झाल्यास तहसिल कार्यालय, चिखली येथे संपर्क करावा.

## कोतवाल पदाकरीता अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

1) इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रीका
2) शाळा सोडण्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र

3) ग्रामसेवक यांचा संबंधीत साजा अंतर्गत समाविष्ट गावाचा रहिवाशी असल्याचा दाखला
4) आरक्षित पदाचे अर्जाकरीता जातीचे प्रमाणपत्र नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अ.जा. व अ.ज. वगळून)
5) उमेदवाराच्या आधारकार्ड/मतदान कार्ड ची छायांकीत प्रत
6) उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्याची जात प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील तसेच शासन निर्णय क्र.बी.सी.सी. 2011/प्रक्र.1064/ 2011/16ब दि.12/12/2011 अन्वये उपस्थित उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा (6) महिन्याच्या आत सादर करावयाच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून घेतल्या नंतर विहित मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
7) आर्थीकदृष्टया दुर्बल घटक प्रवगात अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने तहसिलदार यांचे राज्य शासनाचे विहित नमुन्यातील EWS प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (दि.31 मार्च 2024 पर्यंत वैध असलेले)
8) विवाहीत महिला असल्यास त्याबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नांव बदलाबाबतचे शासन राजपत्र किंवा प्रतिज्ञालेख सादर करावा.
9) सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्र सादर करु नये.

कोतवाल पदाकरीता निवडीची पध्दत

1) कोतवाल संवर्गाची पदे नामनिर्देशनाने भरतांना 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.
2) लेखी परिक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे 50 प्रश्न राहतील. त्यानुसार सदर लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांचे आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
3) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 4 मे 2022 मधील नमुद निकषावर निश्चित करण्यांत येईल.
4) उमेदवारास लेखी परिक्षेत एकूण गुणाच्या किमान 20% गुण प्राप्त करावे लागतील. तरच त्याचा निवड सुची तयार करण्यासाठी विचार केला जाईल. जर उमेदवारास 20% पेक्षा कमी गुण मिळाले तर त्याचा कोणत्याच परिस्थितीत निवड सुची तयार करण्यासाठी विचार करण्यांत येणार नाही.
5) साजासाठी उमेदवारांची अंतिम निवड झाल्यानंतर उर्वरीत उमेदवारातून साजानिहाय गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यांत येईल व सदर प्रतिक्षा यादी 1 वर्षासाठी ग्राहय असेल.

## कोतवाल पद भरती - कालबध्द कार्यक्रम

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहीरात प्रसिध्द करणे | 25/09/2023 |
| 2 | उमेदवारांचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | 06/10/2023 |
| 3 | अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी गाव निहाय तयार करुन प्रसिध्द करणे | 09/10/2023 |
| 4 | आक्षेप मागविणे | 11/10/2023 सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत |
| 5 | आक्षेप निकाली काढून परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे | 12/10/2023 ते 17/10/2023 पर्यंत |

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यव.ही | दिनांक |
|---|---|---|
| 6 | लेखी परिक्षा घेणे | रविवार. दि.22/10/2023 स.11:00 ते दु.12:30 पर्यंत |
| 7 | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे व अंतिम करणे | 23/10/2023 |
| 8 | अंतिम उत्तरतालिका आधारे उत्तरपत्रिका तपासणी करणे | 25/10/2023 |
| 9 | प्रारुप निकाल (प्रारुप निवड यादी व प्रतिक्षा यादी) प्रसिध्द करणे | 26/10/2023 |
| 10 | प्रारुप निकालावर आक्षेप नोंदविणे. आक्षेप निकाली काढणे | प्रारुप निकाल प्रसिध्दी पासून दि.27/10/2023 साय.5.00 वाजेपर्यंत |
| 11 | अंतिम निकाल (अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे) | दि.30/10/2023 |
| 12 | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमीत करणे | दि.31/10/2023 |
| 13 | जिल्हाधिकारी कार्यालयास अंतिम अहवाल सादर करणे | दि.01/11/2023 |

कोतवाल भरती संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांचे राहतील. तसेच पात्रतेच्या दृष्टीकोणातून अंतिम निवड करण्याचे अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

तहसिलदार, चिखली तथा
सदस्य सचिव
कोतवाल पदभरती-2023
कोतवाल तालुका निवड समिती, चिखली

प्रतिलिपी :-

1) [illegible]